**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | Subject |
|---|---|---|---|---|
| Mumbai Chaufer | Mumbai | 02/12/2017 | 07 | Mintage World |

# मिंनटेज वर्ल्डचे प्रदर्शन

मुंबई - एक रुपयाच्या नोटेला नुकतीच शंभरी पूर्ण झाली. १९१७ ते २०१७ या काळात एक रुपये मूल्याच्या १२५ वेगवेगळ्या नोटा जारी झाल्या. यात २८ वेगवेगळी डिझाइन्स, अनुक्रमांक आणि स्वाक्षऱ्या असलेल्या नोटांचा समावेश आहे. आरबीआय गव्हर्नरांची नव्हे, तर अर्थसचिवांची स्वाक्षरी असलेली ही एकमेव भारतीय नोट आहे. या नोटेच्या १०० वर्षांच्या विस्मयकारक प्रवासाला सलाम करण्यासाठी मिंनटेज वर्ल्डच्या वतीने आयएनपीईएक्स-२०१७ नॅशनल फिलॅटलिक खास प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. कफ परेड येथील वर्ल्ड ट्रेंड सेंटरमध्ये तीन डिसेंबर २०१७ पर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांना खास मेमेण्टो दिले जात आहे. १९१७ साली जारी झालेली ही नोट दिसते कशी हे तर लोकांना बघायला मिळावेच, शिवाय एका वैभवशाली इतिहासाचा भाग म्हणून ती घरी घेऊन जाण्याची संधीही मिळावी या हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.